# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/11/2022 (मंगळवार) दुपार


---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा वार्ड नंबर ४, दहेगाव रंगारी येथे दिनांक ०७/११/२०२२ चे ०१.१५ वा. सुमारास यातील अज्ञात आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरमध्ये विना परवाना अवैधरित्या शासकीय रेती खनिज एक ब्रास रेती किंमती अंदाजे ५०००/— रुपयाचा मुद्देमाल विना नंबर असलेला सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली मध्ये दोन्ही किंमती अंदाजे ७०००००/— रुपये चोरी करून वाहतूक करताना मिळून आल्याने त्याचे ताब्यातून असा एकूण ७,०५०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा कढोली शिवार येथे दिनांक ०६/११/२०२२ चे २३.०० वा. ०७/११/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संदिप पंढरी लिचडे, वय ३८ वर्ष, रा. पारडी नागपुर यांचे कढोली शिवार येथे आयार कंपनीचे नविन शोरूम उघडत असल्याने बांधकाम सुरू आहे. त्या ठिकाणी दोन आयसर कंपनीचे ट्रक उभे होते व त्यांना आयसर कंपनीचे टायर लागले होते. नमुद घटना वेळी व ठिकाणी अज्ञात आरोपीने ट्रक ला लागलेले १२ टायर प्रत्येकी किमती अंदाजे २८,०००/—रु. प्रमाणे ३,३६,०००/—रु. व टायरला लागलेले १२ लोखंडी डिस्क प्रत्येकी १३,६००/—रु. प्रमाणे १,६३,०००/रु असा एकुण किमती ४,९९,२००/—रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**